
# मरावे परी नेत्ररुपी उरावे

'मरावे परी किर्ती रुपे उरावे' किती सार्थ आहे ही म्हण! आपल्या भारतीय संस्कृतीत दान देण्यास अनन्यसाधारण महत्त्व आहे. आपल्या जवळील एखादी वस्तु ज्यांच्याकडे त्याची कमतरता आहे अशा व्यक्तीस दान देण्यात जे आत्मिक समाधान लाभते त्याची कल्पना करता येणार नाही.जुन्या काळी राजे, श्रीमंत, वगैरे धन,कपडे, अन्नदान करीत असत व गरीब लोकांचा दुवा घेत. आजच्या युगात लोकांचा जीव वाचविण्यासाठी 'रक्तदान', अंध लोकांना दृष्टी प्राप्त होण्यााठी 'नेत्रदान' व वैद्यकीय ज्ञानासाठी व संशोधनासाठी मरणोत्तर 'देहदान' एखाद्या गरजु व्यक्तीस 'किडनी दान' इ.नवीन संकल्पना रुढ होत आहेत व यास अनन्यसाधारण महत्त्व आहे.आपल्या हिंदू संस्कृतीत दान करुन पुण्य मिळते अशी एक भावना आहे. कुणातरी गरजू रुग्णास वरील दान करण्यास काही श्रीमंत किंवा राजा व्हायची गरज नाही.कोणीही सामान्य व्यक्ती धर्म, लिंग,वर्ण भेद न ठेवता हे सत्कार्य करु शकतो व मानवतेची मूल्ये रोखु शकतो.

जगातील ८ कोटी अंध व्यक्तींपैकी भारतात जवळपास १/४ अंधव्यक्ती भारतात आहेत. कुपोषण, 'अ' जीवनसत्त्वाचा अभाव, डोळ्यात कचरा अथवा रसायने गेल्यामुळे, गोवर, कांजण्या किंवा इतर अन्य कारणांमुळे टीक पडून लहान वयात अथवा तारुण्यात दृष्टी गमावलेल्या रुग्णांची संख्या २५ लाखापर्यंत आहे. यास Corneaopacity अथवा टीक अथवा फुल पडणे असे म्हणतात. अशा व्यक्तीच्या आयुष्यसमोर किर्रर काळोख पसरलेला असतो. सभोवतालच्या जगाचा रंगीबेरंगी आस्वाद घेण्याचे भाग्य, पदोपदी ठेचकाळत या निराशेच्या अंधारात चालणाऱ्या निष्पाप जिवांकडे नसते. यातील बऱ्याच नेत्ररुग्णांना बुबुळावरील आवरण जे पांढरे झाले आहे.(Cornea) त्याची शस्त्रक्रिया करुन जर त्या जागी निरोगी पारदर्शक बुबळ बसवण्यात आले तर गेलेली दृष्टी बऱ्याच अंशी परत लाभू शकते.

सन १९२४ साली अमेरिकेत अशी कल्पना सुचली व ती यशस्वी झाली. आणि अंध:कारात एका प्रकाशाचा झोत आला.या शस्त्रक्रियेस 'नेत्ररोपण'(Keratoplasty) असे म्हणतात. मृत व्यक्तीने स्वेच्छेने केलेले नेत्रदान जिवंत व्यक्तींना डोळस बनवू लागले. परंतु दुर्दैवाने आजही ही चळवळ अंधाचे अश्रू पुसण्यासाठी फारच अपुरी आहे. जितक्या प्रमाणात नेत्रदान व्हावयास हवे तितकी जागृती आजही आपल्या समाजात आली नाही.आज श्रीलंकेसारख्या देशात डोळे काढण्याचा अधिकार सरकारचा आहे.



**नेत्रदान म्हणजे काय?**

कुणाही व्यक्तीने स्वच्छेने मृत्यूनंतर आपले डोळे काढून कुणाही परिचित किंवा अपरिचीत व्यक्तीला दृष्टी मिळावी म्हणून अथवा संशोधनासाठी वापरावयास दिलेली परवानगी.

**नेत्रदान कोण करु शकतो?**

कुणीही जातीधर्म, वंशभेद, वर्णभेद, गरीब, श्रीमंत, स्त्री-पुरुष, लहान-मोठा मरणोत्तर नेत्रदान करु शकतो.वय साधारण १ वर्षापुढे ते सुमारे ७०-८० वर्षापर्यंत.

**कोणाचे नेत्रदान स्विकारता येत नाही?**

मृत व्यक्ती जर जॉन्डीस(Infective Hepatities) व्हायरल मोनंनजायटीस, कॅन्सर, डोळ्यास पूर्वी काही शस्त्रक्रिया झाली असल्यास, एडस्, बुडून मृत्यू आल्यामुळे, फाशी घेतल्यामुळे इ. काही कारणे असू शकतात म्हणून रुग्णांचे मृत्यू निदान (Death Certificate) डोळे काढण्यापूर्वी होणे आवश्यक आहे.

**नेत्रदान कसे करावे?**

आपण मरणोत्तर नेत्रदान करु इच्छिता याची आपल्या नातेवाईकांस माहिती द्यावी व आवश्यक ते फॉर्मस् जवळच्या नेत्रपेढीत भरुन द्यावे. असे इच्छापत्र भरलेल्या रुग्णांचा मृत्यू झाल्यास त्याच्या जवळच्या नातेवाईकांनी लगेच मृत्युकारणमिमांसा करुन घ्यावी व जवळच्या नेत्रपेढीस कळवावे.

मृत व्यक्तीचे डोळे बंद करुन त्यावर बर्फाच्या पाण्याच्या पट्ट्या ठेवाव्यात व अधूनमधून अँटीबायोटिक थेंबाची औषधे डोळ्यात टाकावीत. खोलीतील पंखे बंद करावेत, यामुळे डोळे वाळणार नाहीत.

**नेत्रपेढी म्हणजे काय?**

नेत्रपेढी (Eye Bank) ही एक समाजसेवी संस्था असून ती मरणोत्तर नेत्रदानाची जपणूक करुन गरजू रुग्णांना डोळे उपलब्ध करुन देते. नेत्रदाता व गरजू रुग्ण ह्यांची सूची तयार करणे, संपर्क साधणे, नेत्रदान घडवून आणणे व मिळालेल्या डोळ्याचा सांभाळ करणे व ते गरजुंना उपलब्ध करुनदेणे, नेत्रदानाबाबत चळवळ चालवणे, विविध संशोधन करणे. इ. प्रमुख कार्ये या संस्थेतर्फ केली जातात.

**मृत्यूनंतर किती वेळात डोळे काढावेत?**

साधारण ४–६ तास

**अशा डोळ्यांचे 'नेत्ररोपण' हे किती वेळेच्या आत करावे?**

साधारणपणे २४–४८ तास.परंतु काही कल्चर मिडीया, लिक्वीड नायट्रोजन व अन्य रासायनिक प्रक्रियेमुळे महिना दोन महिने देखील असे डोळे वापरता येतात. काढलेला डोळा हा संपूर्ण कधीच बसविला जात नाही, त्यातील बुबुळाचा भागच (Cornea)फक्त बदलला जातो.

**अशा किती शस्त्रक्रिया यशस्वी होतात?**

सर्व गोष्टी योग्य प्रकारे घडल्यावर सर्वसाधारण ७० टक्के शस्त्रक्रिया यशस्वी होतात. जर दाता व गरजू दोन्हीही तरुण असल्यास व डोळे काढणे व शस्त्रक्रिया यात जास्त वेळ गेला नाही तर यशस्वितेचे प्रमाण सर्वाधिक असते. जर दाता व गरजू यांच्या पेशी एकमेकास अनुरुप न झाल्यास(Tissue Rejection) अशा शस्त्रक्रिया अयशस्वी होऊ शकतात.

**एक व्यक्तीच्या नेत्रदानाने दोन अंध व्यक्तीस दृष्टी लाभ होतो.**

बुबुळावर टीक पडून अंधत्व येणे दुर्दैवाने लहान मुलांत, तरूणांमध्ये, काम करणाऱ्या वर्गात आढळून येते. भारतात सुमारे २५ लाख लोकांमध्ये हया अंधत्वाचे कारण असून जगात सर्वात जास्त अंध व्यक्ती भारतात राहतात. ज्या वयात काम करून राष्ट्र उभारणीत आपले योगदान द्यावे त्यावयात हया तरूणांनी समाजावर व राट्रावर भार टाकावा परावलंबी जीवन जगावे ही गोष्ट देशासाठी भूषणावह नाही. हया लोकांना नेत्रदानाशिवाय पर्याय नाही २५ लाख गरजू आणि नेत्रदान फक्त ३५ ते ४० हजार हे फारच व्यस्त प्रमाण आहे. अंधश्रद्धा व अज्ञान हयामुळे नेत्रदानाचे प्रमाण भारतात कमी आहे. श्रीलंका हया आपल्या शेजारील छोटयाशा देशाकडे आपण पहायला हवे. श्रीलंकेत मोठया प्रमाणात नेत्रदान होते आपली गरज भागवून जगातील अनेक देशांना डोळे निर्यात करण्यात येते. भारतात जैन समाजात नेत्रदानाचे प्रमाण सर्वात जास्त आहे त्याचे इतरांनी अनुकरण करणे गरजेचे आहे. हयामध्ये धर्मगुरूंनी पुढाकार घ्यावा.

भारतामध्ये नेत्रपेढीच्या संख्येत वाढ व्हायला हवी हया सुविधा अतिशय अपुऱ्या आहेत. आता नेत्रदान केलेल्या बुबुळाचे वेगवेगळे विभाग दोन किंवा अंध व्यक्तींना वापरता येतात हयावर जगात मोठया प्रमाणत संशोधन चालू आहे. भारतात हयाचे प्रमाण कमी आहे. नेत्रपेढया उभारण्यावर मोठा खर्च येतो त्यासाठी सेवाभावी संस्थांनी पुढे यावे सरकारनेही आर्थीक मदत करावी. हया प्रकारचे अंधत्व गरीब लोकांमध्ये अधीक आहे. शस्त्रक्रियेचा खर्च त्यांना झेपणार नाही सरकारने हयासाठी ही आर्थीक मदत करावी तरच व्यापक प्रमाणात ही मोहीम राबविता येईल.

नगर शहरात सुमारे वीस वर्षापूर्वी मानकन्हैय्या नेत्रपेढीची स्थापना साईसूर्य नेत्रसेवा हया संस्थेत झाली नगरकरांनी नेत्रदानाची चळवळ अतिशय प्रभावीपणे राबविली हयासाठी अनेक सामाजिक संघटना, वैद्यक व्यवसायीक, सामाजीक कार्यकर्ते वर्तमानपत्रे, तरूणमंडळे पुढे आले आणि आज महाराष्ट्रात सर्वात जास्त नेत्रदान अहमदनगर शहरासारख्या छोटया गावात होते हे निश्चितच दिलासा देणारे आहे, मागील २० वर्षात सुमारे अडीच हजार नेत्ररोपणाच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. डॉ. वर्धमान कांकरिया यांनी नेत्ररोपणाच्या आधुनिक शस्त्रक्रियेबद्दल चेन्नई व ग्रीस (युरोप) मध्ये अभ्यास केला आहे. त्याचाही उपयोग आपल्या येथील रूग्णांना होतो आहे. महाराष्ट्रशासनानेही मानकन्हैय्या नेत्रपेढीचा गौरव सातत्याने केला आहे आणि हे यश नगर शहरातील जनतेचे आहे. परंतू अजूनही फार मोठा प्रवास करायचा आहे अंधत्व दूर करण्यासाठी मोठया प्रमाणात जनजागृती होणे आवश्यक आहे. नेत्रदानाचे प्रमाण वाढणे आवश्यक आहे.

---

**लेखिका : डॉ. सुधा कांकरिया, मानकन्हैय्या आय बँक, साई सूर्य नेत्रसेवा, अहमदनगर**